# स्त्रीवादी साहित्यप्रवाहातील संस्कृती दर्शन

**वैष्णवी माळी.**

के.एल.ई. संस्थेचे जी.आय. बागेवाडी कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, निपाणी.

DOI: https://doi.org/10.5281/zenodo.17259958

## ABSTRACT:

प्रस्तुत लेख स्त्रीवादी साहित्यप्रवाहातील संस्कृती दर्शन या विषयावर आधारित आहे. साहित्य हे समाजाचे प्रतिबिंब असून, दीर्घकाळ दुर्लक्षित राहिलेल्या स्त्रीच्या अनुभवांना आणि संघर्षांना वाचा फोडण्याचे कार्य स्त्रीवादी साहित्याने केले आहे. पुरुषप्रधान संस्कृतीने लादलेल्या मर्यादांना आव्हान देत, हा प्रवाह स्त्रीच्या आत्मभान, स्वातंत्र्य आणि समानतेच्या आकांक्षा अधोरेखित करतो.

मराठी साहित्यात शांता शेळके आणि गौरी देशपांडे यांनी स्त्रीचे भावविश्व व आधुनिक विचार मांडले, तर सावित्रीबाई फुले, ताराबाई शिंदे आणि सिंधुताई सपकाळ यांनी प्रत्यक्ष जीवनात सामाजिक क्रांती घडवली. या साहित्यातून आणि कार्यातून पितृसत्ताक व्यवस्थेवर टीका, स्त्रीपुरुष समानतेची मागणी, आणि बदललेल्या सांस्कृतिक मूल्यांचे दर्शन होते. स्त्रीवादी साहित्यप्रवाह हा केवळ साहित्यिक नव्हे, तर सामाजिक क्रांतीचे प्रतिबिंब असून, तो भारतीय संस्कृतीला नवा, न्याय्य आणि प्रगतीशील दृष्टिकोन देतो.

## KEYWORDS:

स्त्रीवादी साहित्यप्रवाह, पितृसत्ताक संस्कृती, स्त्रीपुरुष समानता, आत्मभान, सामाजिक क्रांती.

**प्रस्तावना:**

साहित्य हे समाजाचे प्रतिबिंब मानले जाते. साहित्य हे फक्त कल्पनारंजन नसून ते समाजाचे वास्तवही दाखवते. समाजातील बदलते विचार, मूल्ये, संस्कृतीतील उलथापालथ, जीवनपद्धतीतील बदल हे सर्व साहित्यामध्ये दिसून येते. भारतीय समाजरचनेत दीर्घकाळ स्त्रीला दुय्यम स्थान देण्यात आले. तिच्या इच्छाआकांक्षांना फारसे महत्त्व दिले गेले नाही. तिच्या शिक्षणाला, रोजगाराला, सामाजिक सहभागाला मर्यादा घालण्यात आल्या. परंपरेत स्त्रीचे रूप आई, पत्नी किंवा कन्या म्हणून गौरविले, पण तिचे स्वतंत्र व्यक्तिमत्व व समाजातील योगदान याकडे दुर्लक्ष केले गेले.

अशा पार्श्वभूमीवर स्त्रीवादी साहित्यप्रवाह उदयास आला. हा प्रवाह स्त्रीच्या अनुभवांना वाचा देतो, तिच्या संघर्षांना शब्दबद्ध करतो, तिचे प्रश्न, स्थान, हक्क आणि स्वातंत्र्याची आकांक्षा या प्रवाहात प्रकर्षाने व्यक्त होते आणि संस्कृतीत समता व न्याय यांची बीजे पेरतो. हा केवळ साहित्यिक प्रवाह नसून सामाजिक क्रांतीची पायरी आहे. स्त्रीवादी साहित्यप्रवाहाची महत्ता समजावून घेण्यासाठी आपण साहित्यविश्वातील काही उदाहरणे पाहू शकतो, तसेच वास्तव जीवनातील काही व्यक्तिमत्त्वांचा विचार करू शकतो. मराठी साहित्यात शांता शेळके, गौरी देशपांडे यांनी स्त्रीच्या संवेदनांना स्वर दिला, तर समाजकार्यात सिंधुताई सपकाळ, सावित्रीबाई फुले, ताराबाई शिंदे इ. यांनी स्त्रीच्या जिद्दीचे प्रत्यक्ष अधोरेखन घडविले. यामुळे साहित्य आणि जीवन या दोन्ही अंगांनी स्त्रीवादी प्रवाहाचे उत्तम दर्शन घडते.

**स्त्रीवादी साहित्य प्रवाहाची गरज व वैशिष्ट्ये:**

पुरुषप्रधान संस्कृतीत स्त्रीला नेहमीच गौण स्थान देण्यात आले. तिला कुटुंबापुरते मर्यादित ठेवून तिच्या स्वप्नांना दाबले गेले. भारतीय परंपरेत स्त्रीला सहनशील, त्यागमूर्ती आणि कर्तव्यनिष्ठ असे स्थान दिले. स्त्रीवादी साहित्याने या चौकटीला आव्हान दिले. या प्रवाहाची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे

» स्त्रीच्या अनुभवांना केंद्रस्थानी आणणे.

» शिक्षण, रोजगार, राजकीय सहभागाची मागणी करणे.

» पितृसत्ताक व्यवस्थेवर प्रखर टीका करणे.

» संस्कृतीत समानतेची मूल्ये दृढ करणे.

» स्त्रीच्या आत्मभानाचे व स्वत्वशोधाचे अधोरेखन करणे.

**साहित्यिक योगदान:**

मराठी साहित्यविश्वात अनेक लेखकलेखिकांनी स्त्रीवादी प्रवाहाला चालना दिली.

शांता शेळके यांच्या कवितांमध्ये स्त्रीचे कोमल भावविश्व, प्रेम, विरह, आकांक्षा तर कधी जिद्द प्रतिबिंबित झाली आहे. गौरी देशपांडे यांच्या कथांमध्ये आधुनिक स्त्रीचे वास्तववादी चित्रण दिसते. त्यांनी स्त्रीच्या स्वतंत्र विचारांना व स्वप्नांना शब्द दिले.

सिंधुताई सपकाळ साहित्याबरोबरच वास्तव जीवनातही स्त्रीवादी विचारांचे प्रतिबिंब दिसते. त्याचे उत्कृष्ट उदाहरण म्हणजे सिंधुताई सपकाळ!! बालवयात झालेल्या अन्यायांवर मात करून त्यांनी हजारो अनाथांना आईचे मायेचे छत्र दिले. त्यांचे आयुष्य हे स्त्रीच्या सहनशीलतेचे, जिद्दीचे आणि समाज परिवर्तनाच्या शक्तीचे मूर्तिमंत उदाहरण आहे. त्यांनी दाखवून दिले की स्त्री फक्त कुटुंबापुरती मर्यादित नसून ती संपूर्ण समाजाचे आयुष्य घडवू शकते. त्यांच्या आयुष्यावरती पुस्तकेही प्रकाशित झालेली आहेत.

सावित्रीबाई फुले सावित्रीबाई फुले यांनी समाजातील प्रथापरंपरांना आव्हान देत स्त्री शिक्षणाची शाळा सुरू केली. अपमान, विरोध सहन करूनही त्यांनी स्त्रियांना आत्मनिर्भरतेचा मार्ग दाखवला. त्यांच्या कवितांमधूनही स्त्रियांच्या हक्कांचा आणि समानतेचा ठाम संदेश दिसतो. "जर मुलींना शिक्षण मिळालं, तर त्या स्वतःचे जीवन घडवू शकतील" हा त्यांचा ठाम विचार होता. त्यांनी लेखनातूनही स्त्रियांना उभारी दिली. सावित्रीबाईंचं कार्य हे केवळ शिक्षणापुरतं नव्हतं, त्यांनी विधवा पुनर्विवाह, अस्पृश्यता निर्मूलन, स्त्रीपुरुष समानता अशा सामाजिक सुधारणा चळवळीला चालना दिली.

ताराबाई शिंदे ताराबाई शिंदे यांनी १८८२ साली लिहिलेला "स्त्री पुरुष तुलना" हा ग्रंथ त्या काळाच्या वास्तवातूनच जन्माला आला.

एका पतिव्रता स्त्रीवर व्यभिचाराचा आरोप करून तिला शिक्षा देण्यात आली होती, पण त्याचप्रमाणे पाप करणाऱ्या पुरुषावर मात्र कोणीही कारवाई केली नाही. या अन्यायकारक घटनेवर ताराबाई शिंदे संतापल्या आणि त्या लेखातून स्त्रियांच्या बाजूने निर्भीडपणे आवाज उठवला.

**माझे विचार:**

माझ्या दृष्टीने स्त्रीवादी साहित्यप्रवाह हा केवळ स्त्रीपुरता मर्यादित नसून, संपूर्ण समाजाच्या प्रगतीसाठी आवश्यक आहे. स्त्रीला समान संधी मिळाल्यास संस्कृतीत नवे मूल्य उदयास येतात. साहित्यकारांनी केवळ स्त्रीच्या वेदना न मांडता तिच्या क्षमता, तिची स्वप्ने व तिच्या समाज परिवर्तनातील भूमिका यांचा उत्सव साजरा करायला हवा. स्त्रीचे जीवन हे प्रेरणेचे झरे आहेत आणि त्यातून संस्कृतीला नवसंजीवनी मिळते हा माझा ठाम विश्वास आहे. स्त्रीला समाजाची साथ आणि तिचा आत्मविश्वास दृढ असेल, तर ती जगाला पुरून उरू शकते.

स्त्रीवादी साहित्य प्रवाह हा आधुनिक भारतीय संस्कृतीचा महत्त्वपूर्ण टप्पा आहे. त्यातून स्त्रीच्या वेदना, संघर्ष आणि आकांक्षा व्यक्त झाल्या. शांता शेळके व गौरी देशपांडे यांच्या लेखनातून स्त्रीच्या भावविश्वाला अभिव्यक्ती मिळाली, तर सावित्रीबाई फुले, ताराबाई शिंदे यांनी सामाजिक आणि शैक्षणिक पातळीवर स्त्रीच्या हक्कांसाठी लढा दिला. सिंधुताई सपकाळ यांच्या कार्यातून स्त्रीच्या जिद्दीचे आणि मातृत्वाचे अनोखे दर्शन घडले.

आजच्या काळात स्त्रीच्या भूमिका बदलत असल्या तरी अनेक आव्हाने उभी आहेत. स्त्रीवादी साहित्य प्रवाह हा आव्हानांना सामोरे जाण्यासाठी प्रेरणा देतो. माझ्या मते साहित्य आणि जीवन या दोन्ही स्तरांवर स्त्रीच्या अनुभवांना योग्य स्थान मिळाले, तरच समाजात खरी समानता, न्याय, प्रगती आणि संस्कृतीचे उत्थान साध्य होईल.

» गौरी देशपांडे यांनी ‘उतारा’ ही कादंबरी लिहिली आहे व स्त्रीअस्तित्व, प्रेम, समाजातील बंधनांवर लेखन केले आहे.

» शांता शेळके यांनी ‘कुठे नाही ठाव’ ही कविता, ‘शब्दांनी सजलेली वाट’ हा निबंध तसेच गझल, ललितलेख लिहिले आहेत.

» सिंधुताई सपकाळ यांनी ‘मी वनवासी’ या आत्मचरित्रात त्यांचे

जीवन वर्णिलेले आहे व समाजासमोर एक आदर्श निर्माण केला आहे.

» सावित्रीबाई फुले यांनी ‘जगण्यामरण्याच्या गोष्टी’ हा लेखसंग्रह आणि शिक्षण, स्त्रीस्वातंत्र्य व जातीभेदाविरुद्ध विचार लिहिलेले आहेत.

» ताराबाई शिंदे यांनी ‘स्त्री पुरुष तुलना’ ही मराठीतील पहिली स्त्रीवादी समीक्षा मानली जाते.

मराठी व भारतीय साहित्यातील एक महत्त्वपूर्ण प्रवाह म्हणजे स्त्रीवादी साहित्य. स्त्रियांच्या अनुभवांना, भावनांना, संघर्षांना व त्यांच्या सांस्कृतिक अस्तित्वाला या साहित्यात महत्त्व मिळते. हे साहित्य पितृसत्ताक समाजव्यवस्थेला प्रश्न विचारते आणि स्त्रीची खरी ओळख शोधते. स्त्रीवादी साहित्य म्हणजे स्त्रियांच्या जीवनातील अनुभवांचे कलात्मक चित्रण. यात स्त्रीचा केवळ उपभोगाचा विषय न होता, स्वतंत्र व्यक्तिमत्त्व असलेली मानवी अस्तित्व म्हणून मांडणी होते.

यातून स्त्रीच्या सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय, लैंगिक वास्तवाचा मागोवा घेतला जातो.

यात स्त्रीचा केवळ उपभोगाचा विषय न होता, स्वतंत्र व्यक्तिमत्त्व असलेली मानवी अस्तित्व म्हणून मांडणी होते. यातून स्त्रीच्या सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय, लैंगिक वास्तवाचा मागोवा घेतला जातो.

स्त्रीवादी साहित्यातील प्रमुख वैशिष्ट्ये: स्त्रीच्या जगण्याचा प्रामाणिक आलेख, स्त्रीच्या घरगुती, सामाजिक व मानसिक वेदना व्यक्त होतात. पितृसत्ताक व्यवस्थेविरुद्ध प्रश्नचिन्ह, पुरुषप्रधान परंपरा, रूढी, धार्मिक बंधने यांना आव्हान. स्वातंत्र्य व आत्मसन्मानाची आकांक्षा, स्त्रीचे स्वावलंबन, शिक्षण, अधिकार यांचे प्रतिपादन. लैंगिक भेदभावाविरुद्ध संघर्ष, स्त्रीपुरुष समानतेची जाणीव. सांस्कृतिक मूल्यांचा पुनर्विचार: विवाह, मातृत्व, कौटुंबिक जबाबदाऱ्या, संस्कार यांचे नवे आकलन.

**स्त्रीवादी साहित्यातील सांस्कृतिक दर्शन:**

स्त्रीवादी साहित्यामुळे अनेक सांस्कृतिक पैलू समोर येतात: घरगुती संस्कृतीचे दर्शन, स्त्रीचे जीवन ‘घरापुरते’ मर्यादित कसे केले

गेले, याचा मागोवा. कुटुंबातील जबाबदाऱ्या, सांस्कृतिक रूढी, लग्नपालकत्व यांचा ताण. समाजव्यवस्थेचे दर्शन, पुरुषसत्ताक वर्चस्वामुळे स्त्रीला दुय्यम स्थान, स्त्रीवर होणारे अन्याय, बहुपत्नीत्व, हुंडा, बालविवाह यांचे चित्रण. स्त्रीचे आत्मभान व सांस्कृतिक परिवर्तन, शिक्षण, स्वावलंबन, नोकरी, राजकीय सहभागातून स्त्रीचे नव्याने घडणारे सांस्कृतिक रूप. आधुनिक स्त्री पारंपरिक चौकटी मोडून नवा सांस्कृतिक आदर्श उभा करते.

**निष्कर्ष:**

सामाजिक संघर्षाचे दर्शन, स्त्रीच्या हक्कांसाठी चळवळी, संघटना, साहित्यिक व सांस्कृतिक चळवळी उदा. स्त्रीवादी लेखनातून उभा राहिलेला प्रश्न. सांस्कृतिक वारसा आणि त्यातील विसंगती, परंपरेत स्त्रीला पूजनीय मानले, पण वास्तवात तिच्यावर अन्याय. या विरोधाभासाचे दर्शन स्त्रीवादी लेखनातून स्पष्ट होते. स्त्रीवादी साहित्यिकांचे योगदान: शांता शेळके स्त्रीच्या भावविश्वाचे संवेदनशील चित्रण. प्रभा गणोरकर स्त्रियांच्या सामाजिकसांस्कृतिक वेदना.

शांता जोगळेकर, विद्युत भागवत, मीनाक्षी मुकेर्जी, कमला भसीन स्त्रीवादाचा सिद्धांत आणि आचार.

आंतरराष्ट्रीय स्तरावर व्हर्जिनिया वुल्फ, सिमोन द बोव्हार यांचा प्रभाव. स्त्रीवादी साहित्य हे केवळ स्त्रीच्या समस्या मांडणारे साहित्य नाही, तर समाजसंस्कृतीतील विसंगती दाखवून नवा मूल्यदृष्टिकोन घडवणारे साहित्य आहे. या साहित्यातून स्त्रीचे मानवी अस्तित्व, तिचा सन्मान, स्वातंत्र्य आणि न्याय्य स्थान अधोरेखित होते.

त्यामुळे स्त्रीवादी साहित्यातील सांस्कृतिक दर्शन हे एक सामाजिक क्रांतीचे प्रतिबिंब म्हणता येईल.

## संदर्भ ग्रंथ:


1. “मी वनवासी” सिंधुताई सपकाळ रिया पब्लिकेशन पुणे.
2. “स्त्री पुरुष तुलना” ताराबाई शिंदे, सुधीर काळे वर्धा, पुणे.
3. शांता शेळके यांच्या साहित्यातील स्त्री वेदना डॉ. सविता ज्ञानेश्वर वावगे.
4. मराठी लोकांची संस्कृती इरावती कर्वे.
5. सावित्रीबाई फुले काल आणि कर्तृत्व महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई.
6. ऋणानुबंध एक आस्वाद प्रा.नरेंद्र मारवाडे नाथ प्रकाशन औरंगाबाद.



**Funding:**

This study was not funded by any grant.

**Conflict of interest:**

The Authors have no conflict of interest to declare that they are relevant to the content of this article.



**About the License:**

© The Authors 2024. The text of this article is open access and licensed under a Creative Commons Attribution 4.0 International License.